महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०६ वा | दिनांक : ०९/०६/२०२५ | वार : सोमवार

## ३२ वर्षानंतर साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

**सातारा** : सातारा शहरांमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ३२ वर्षानंतर होत आहे. बाबरी मशिदीच्या पतनानंतर ज्येष्ठ साहित्यिक व नाटककार विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली साताराच्या छत्रपती शाहू स्टेडियम येथे १९९३ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. त्यानंतर आता ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे होण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेची शाहूपुरी सातारा शाखा आणि मावळा फाउंडेशन, सातारा यांच्या संयोजनाखाली हे संमेलन होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची पुणे येथे आज संमेलनाच्या स्थळाच्या निश्चितीबाबत बैठक झाली आणि त्या बैठकीनंतर सातारला संमेलन होणार असल्याची घोषणा निवड समितीच्या वतीने साहित्य महामंडळाने केली.

यापूर्वी सातारा शहरांमध्ये १९०५ साली ॲडवोकेट रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. त्यानंतर १९६२ साली ४४ वे साहित्य संमेलन नरहर विष्णू उर्फ काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली, तर १९६५ साली ४६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे वामन लक्ष्मण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली सातारा येथे झाले होते. त्यानंतर विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली १९९३ साली ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे झाले होते. आता ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे सातारा येथे होणार आहे.

सातारा शहर वगळता कराड शहरामध्ये दोन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने झाली आहेत. १९७५ सालचे ५१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा दुर्गा भागवत होत्या. तर २००३ साली झालेल्या ७६ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुभाष भेंडे होते. महाबळेश्वर येथे डॉ.आनंद यादव यांच्या अध्यक्षतेखाली २००९ साली ८२ वे साहित्य संमेलन झाले.

दुर्गा भागवत यांच्या अध्यक्षतेखाली कराड येथे झालेले साहित्य संमेलन आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर झाले होते. त्या वेळचे दुर्गाताईंचे भाषण गाजले होते. स्वागताध्यक्ष असूनही यशवंतराव चव्हाण हे श्रोत्यांमध्ये बसले होते. महाबळेश्वरला झालेले साहित्य संमेलन गाजले ते डॉ आनंद यादव हे संमेलनाध्यक्ष असूनही संमेलनाला उपस्थित राहिले नाहीत म्हणून. त्यामुळे सातारला विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संमेलनाच्या अगोदर बाबरी मशिदीच्या पतनानंतर हिंदू मुस्लिम तणाव वाढला होता व हिंसाचारात अनेकांचे बळी गेले होते. या पार्श्वभूमीवर हे संमेलन घेऊ नये अशी भूमिका फुले आंबेडकर साहित्य पंचायतीच्या वतीने घेण्यात आली होती. तसेच मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाचा ठराव संमेलनात घ्यावा अशी ही नामांतरवाद्यांनी भूमिका घेतली होती, त्या पार्श्वभूमीवर हे संमेलन गाजले होते.

सातारला विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली ३२ वर्षांपूर्वी झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून तत्कालीन नेते स्मृतीशेष अभयसिंहराजे भोसले होते. या वेळच्या साहित्य संमेलनाच्या आयोजनाबाबतही व ते सातारला व्हावे यासाठी आग्रह धरणारांमध्ये अभयसिंहराजे भोसले यांचे सुपुत्र व महाराष्ट्राचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आहेत. त्यामुळे ते स्वागताध्यक्ष व्हावेत यासाठी अनेक जण प्रयत्न करणार यात शंका नाही. मात्र त्याच वेळी खासदार उदयनराजे भोसले व सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई यांचीही नावे स्वागताध्यक्ष पदासाठी चर्चिली गेली नाहीत तर नवलच.
99 साहित्य संमेलन साताऱ्यात होणार अशी घोषित झाल्यानंतर आता साताऱ्यात संयोजकांच्या वतीने पोवई नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसरात जल्लोष सोहळा आयोजित केला आहे.

## लाडकी बहीणच्या आडून भाजपने निवडणूक हायजॅक केली - संजय राऊत



**मुंबई** : कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या लेखातून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवरून भाजपवर टीका केली होती. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाल्याचे पाहायला दिसत आहे. तसेच आजच्या पत्रकार परिषदेत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील महाराष्ट्र विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाने हायजॅक केल्याचा दावा केला आहे. लाडकी बहीण योजनेच्या आडून भाजपने त्यांचे चांगभलं केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले, राहुल गांधी यांनी जे म्हटले आहे ते आम्ही पूर्वीपासूनच सांगत होतो. राज्यातील विधानसभा निवडणूक ही भाजपने चोरली, लुटली आणि दरोडा घातला. राहुल गांधी हे सातत्याने तेच सांगत आहेत आणि आम्ही सुद्धा तेच बोलत आहोत. राज्यात भाजपा आणि त्यांच्या टोळ्यांचा विजय होऊच शकत नव्हता. सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणूक आम्ही जिंकल्यावर असे त्यानंतरच्या सहा महिन्यात काय घडले की ज्याच्यामुळे तुम्हाला इतका मोठा एकतर्फी विजय प्राप्त व्हावा, असा सवाल त्यांनी महायुतीला विचारला. ते तर २५ जागा सुद्धा जिंकू शकत नव्हते, असा दावाही संजय राऊतांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले, लाडकी बहीण या आवरणाखाली ही निवडणूक भाजपने हायजॅक केली. राहुल गांधी यांनी जे पाच मुद्दे उपस्थित केले ते वारंवार केले आहेत आणि आंतरराष्ट्रीय मंचावर सुद्धा उपस्थित केल आहेत. भारतातील लोकशाही ही मोदी-शाह-फडणवीस यांनी हायजॅक केली. निवडणूक आयोगापासून अनेक संवैधानिक संस्थांना त्रास दिला आहे. खोटं बोलण्याचा नोबेल पुरस्कार भारतीय जनता पक्ष आणि त्यांचे नेते मोदी यांना द्यायला हवा, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना संजय राऊत म्हणाले, त्यांचे बाळासाहेबांवरील प्रेम बेगडी आहे. २०२२ मध्ये जेव्हा शिवसेनेत बंड झाले, एकनाथ शिंदे यांनी ४० आमदार घेऊन बंड केला. शिंदेंनी थेट सेनेवरच ताबा सांगितला. त्यावेळी ते खूप घाबरले होते. एकनाथ शिंदे माझा अत्यंत जवळचा मित्र. तो मला सांगत होता माझ्याबरोबर चल. मी म्हटले तू पण जाऊ नको, तुम्ही का जात आहात? अयोध्येला आम्ही एकत्र गेलो होतो. माझ्या खोलीत येऊन मला ते सांगत होते की आपण जाऊ. शेवटी एकनाथ शिंदे हे घाबरुनच गेले.

## आमची अंत्ययात्रा निघाली तरी चालेल:पण आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटणार नाही- बच्चू कडू



**अमरावती** : शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तसेच शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ आणि दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू हे बेमुदत अन्नत्याग करणार आहेत. मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीजवळ आजपासून (८ जून) आंदोलनाची जोरदार सुरुवात होणार आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील संत गाडगेबाबा मंदिरापासून ते मोझरी येथील समाधीपर्यंत भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत राज्यभरातून तब्बल २० हजार शेतकरी सहभागी होणार आहेत. आंदोलनपूर्वी बोलताना आमदार बच्चू कडू यांनी ठाम भूमिका मांडली. ते म्हणाले, आमची अंत्ययात्रा निघाली तरी चालेल, पण आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. त्यांच्या या विधानामुळे आंदोलनाच्या तीव्रतेचा अंदाज येतो.

बच्चू कडू म्हणाले, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर मच्छीमारांसाठी आंदोलन करत आहे. यासंदर्भात शासनाकडून आश्वासन मिळाली होती. परंतु त्याची पुर्तता झाली नाही. आता जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही. शेतमालांचे भाव पडलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव दिला पाहिजे. घरकुलाचा मुद्दा आहे. मच्छीमारांचा, मेंढपाळ यांचा मुद्दा आहे. अनेक वेळा पत्र देऊनही मागण्या मान्य झाल्या नाही. त्यामुळे अन्नत्याग आंदोलन करण्याची वेळ आमच्यावर आली आहे.

दिव्यांगांना मिळणारे मानधन वेळेवर मिळत नसल्याची तक्रार आहे. यावर बोलताना बच्चू कडू म्हणाले, अधिकारी आणि मंत्र्यांचे पगार वेळेवर होत आहे. परंतु दिव्यांगांचा निधी वेळेवर मिळत नाही. निराधारांचे पगार वेळेवर होत नाही. सरकार जाणीवपूर्वक मुद्द्यांच्या लढाईपासून लोकांना दूर करत आहे. त्यामुळे आता जोपर्यंत मागण्या मंजूर होत नाही, तोपर्यंत आम्ही तिथून हटणार नाही. माझी अंत्ययात्रा निघाली, तरी आम्ही आमच्या मुद्द्यांपासून दूर होणार नाही.

दरम्यान, राज्यात सध्या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. यावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले, ठाकरेंचा हा कौटुंबिक विषय आहे. मुद्दे घेऊन ते एकत्र झाले तर फार चांगले होईल. राज ठाकरे, उद्धव ठाकरे एका घरातील आहे, म्हणून एकत्र येऊ नये, तर मुद्द्यांवर एकत्र आले पाहिजे. मुंबई वाचवणे फार महत्त्वाच आहे.
राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील निवडणुकीबद्दल लिहिलेल्या लेखावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले, ईव्हीएम मशीन हे खरे पाहिले तर कॉंग्रेसचे पाप होते. त्यांनी बी पेरले. कॉंग्रेसच्या त्या बियाला विषारी फळ भाजपने लावले आहे. त्याचे हे परिणाम आहे. ईव्हीएम मशीनने लोकशाहीला घाला घातला आहे. खून करण्याचे काम भाजपने केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ जून २०२५

## डॉ. प्रभाकर शेळके यांना उत्कृष्ट कथालेखन पुरस्कार



**जालना :** जालना येथील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या डबल ढोलकी या कथासंग्रहास मानाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट कथालेखन पुरस्कार पुणे येथील ज्ञानज्योत फाउंडेशन व संत गाडगे महाराज विचारमंच महाराष्ट्र राज्य पुणे संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देण्यात आला यावेळी पुणे स्थित दुर्गेश प्रभाकर शेळके यांनी तो पुरस्कार स्वीकारला.या प्रसंगी महाराष्ट्रांतील साहित्यिक जगदीश ओहळ, डॉ.रामदास कुटे, संस्थापक अध्यक्ष सौ.कविता काळे,सौ.कांचन मुन, रणजित पवार डॉ.खं.र. माळवे यांच्या शुभहस्ते हा सन्माननीय पुरस्कार देण्यात आला त्यांच्या या यशाबद्दल रामभाऊ शेळके,कमल शेळके,सांडू लोखंडे, भीमराव पदमे, पंढरीनाथ मांदळे, नामदेव शेळके,प्रकाश टोंपे, विश्वनाथ गायकवाड, बाबा उगले, विजय गाढवे पाटील भगवान शेळके,मथुराबाई शेळके, सुनीताराजे शेळके,कैलास भाले मनीष पाटील सुनील लोणकर दर्दे केशव धांडे बाबासाहेब ताठे किशोर राऊत अरुण काफरे अर्जून गायकवाड दशरथ बुणगे अनिरुद्ध पावसे भगवान सवळे जालिंदर बटुळे रमेश नाईक नारायण खरात इ.अभिनंदन केले.

## मुरूम शहरात शिवराज्याभिषेक दिनानिमित्ताने मान्यवरांच्या हस्ते दुग्धाभिषेक



**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले) :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त शहरातील शिवाजी चौकात शुक्रवारी (ता. ६) रोजी मराठा सेवा संघाकडून शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पानिपत येथे कार्यरत असलेले मुरुमचे सुपुत्र डॉ. शिवाजी शिंदे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, गणेश अंबर, बशीर जमादार, सचिन शिंदे आदींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करुन पुष्पवृष्टी करण्यात आली. शिवभक्तीने भारलेल्या वातावरणात जय जिजाऊ, जय शिवराय चा गजर ऐकू येत होता. यावेळी अजित चौधरी, श्रीकांत मिनियार, डॉ. शिवाजी शिंदे यांनी मनोगते व्यक्त केली. त्यांनी बोलताना सांगितले की, आजच्या तरुणांनी महाराजांच्या शौर्याचा आदर्श घेऊन समाजहितासाठी काम करणे गरजेचे आहे. शिवराज्याभिषेक ही आत्मसन्मानाची घोषणा होती. आपल्या भूमीत स्वराज्य स्थापणेचा अभिमान महाराजांनी दाखवला. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य ही केवळ राजसत्ता नव्हती, तर ती सामाजिक समता व न्यायाची चळवळ होती. अशा कार्यक्रमांद्वारे नव्या पिढीला इतिहासाची प्रेरणा मिळते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. महेश मोटे होते. अध्यक्षीय समारोपप्रसंगी ते म्हणाले की, शिवराज्याभिषेक ही धार्मिक वा केवळ राजकीय घटना नव्हती तर ती सामाजिक समतेचा संदेश देणारी घटना होती. महाराजांनी सर्व जाती-धर्मांना एकत्र घेऊन चालवलेले शासन हे आजच्या काळात आदर्श ठरावे असे आहे. महाराजांच्या समाजकारण व राजकारणाचा आजच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांनी देखील अवलंब केला पाहिजे. याप्रसंगी लखन भोंडवे यांनी ओघवत्या शैलीत प्रास्ताविक सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन जाधव तर मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष श्रीधर इंगळे यांनी आभार मानले. यावेळी चंद्रशेखर मुदकन्ना, रफिक पटेल, प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड, सुरेश मंगरूळे, बाबा कुरेशी, गौस शेख, शाहूराज शिंदे, आनंद भुसाळे, आप्पासाहेब बोराळे, धनराज शिंदे, भरत व्हनाळे, ज्योतिबा शिंदे, सिद्धलिंग हिरेमठ, हारून जेवळे, शाहीद येणेगुरे, आकाश क्षीरसागर, सुरेश गायकवाड, बाबुराव बेगमपुरे, मनीष ब्याळे आदींची उपस्थिती होती. संजय सावंत, अजिंक्य मुरुमकर, गणेश कडगंचे, हुसेन तांबोळी, प्रल्हाद माने आदींनी पुढाकार घेतला.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ जून २०२५

# विजुची आई




माझ्या मेंदूत कितीतरी नद्यांनी
वादळ उठवलीत
मला भस्मसात करण्यासाठी पण
माझ्या मायनं दिलेला कानमंत्र
खूप कामी पडतो कधी कधी
ती गेल्यावर सुद्धा...

पण तिच्या
प्रत्येक शब्दाचं
मोल करताना मीच कमी
पडतो कधी कधी
नाहीतर
वादळं सुद्धा
हजार वेळा विचार करतील
अंगावर झेपावतांना माझ्या...

आई
तुझ्या पदराची सावली हवी होती छपरावर माझ्या,
मी मोठा झालो म्हणून काय झालं
निदान डोक्यावरून तरी
मायेने हात फिरवून घेतला असता मी,
अन् तुझी नातवंड तू
अंगा-खांद्यावर जोजवली असतीस...

नातवंड तर तुझा
फोटो
जवळ घेऊनच झोपलीत
कित्येक वेळा अंथरुणात,
अन् आजी कशी असेल ?
म्हणून अश्रूंचा अभिषेक केलाय
तुझ्या फोटोवर त्यांनी,

तेव्हा
मलाही नाही समजवता आलं त्यांना
दाटून आलेल्या गळ्यानं अन्
डबडबलेल्या डोळ्यानं...

तुझ्या उपकाराची परतफेड माय
मी कधीच करू शकनार नाही,
तुझी सेवा करता आली असती तर
तू माझ्याजवळ नाही.

आई एक कामं कर
मी येईल तुझ्याकडे तेव्हा
बाजूला एक जागा ठेव,
डोक्यावरून हात फिरवत
जोजव तू मला.

मी सुद्धा तुला बिलगुन
धूमसून रडणार आहे.
सारा पश्चात्ताप मी माझा
तुलाच सांगणार आहे.

**विजय कुशिवताई शेळके**
९४०४९८१५९७
छ.संभाजीनगर

# भुशी डॅममध्ये बुडून दोन तरुणांचा मृत्यू




**पुणे** : पुण्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या भुशी धरणात रविवारी दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. हे दोघे तरुण आपल्या दहा मित्रांसह डॅम परिसरात फिरण्यासाठी आले होते. दोघेही धरणात गेले असता, खोल पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा मृत्यू झाला. रविवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. शिवदुर्ग रेस्क्यू टीमच्या मदतीने दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

मो. जमाल आणि साहिल अश्रफअली शेख अशी मृतांची नावे आहेत. मो. जमला हा तरुण उत्तर प्रदेशातील तुलापुर येथील आहे. तर साहिल अश्रफअली शेख हा पिंपरी-चिंचवडमधील डांगे चौक परिसरातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे दोघे जण त्यांच्या अन्य आठ मित्रांसोबत लोणावळ्यातील भुशी धरण परिसरात वर्षाविहारासाठी आले होते.

प्रशासनाने भुशी धरण परिसरात तारेचे कुंपण लावलेले असले तरी अनेक पर्यटक ते कुंपण तोडून धरणाच्या पाठीमागील धबधब्याजवळ पोहोचतात. जमाल आणि साहिलही याच मार्गाने धबधब्याजवळ गेले. तिथून त्यांनी पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज आला नाही आणि त्यांचा बुडून मृत्यू झाला. त्यांच्या मित्रांनी आरडाओरड केली, मात्र काही उपयोग झाला नाही. घटनेची माहिती मिळताच शिवदुर्ग रेस्क्यू टीम आणि लोणावळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचाव कार्य सुरू केले. काही वेळानंतर दोघांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले.

प्रतिबंध घालण्यात आलेल्या ठिकाणी पर्यटकांनी जाऊ नये. भुशी धरणाच्या आजूबाजूला तारेचे कुंपण घालण्यात आले आहे. ते तुमच्या सुरक्षेसाठी आहे. ते ओलांडून जाऊ नये, असे आवाहन वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुहास जगताप यांनी पर्यटकांना केले आहे.

दरम्यान, सध्या राज्यात मान्सून वेळेच्या आधीच दाखल झाल्यामुळे धरण परिसरात पाण्याचा भरपूर साठा आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांवर हिरवळ पसरलेली असून, नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने लोणावळ्यात दाखल होत आहेत. मात्र, सुरक्षिततेच्या सूचना धाब्यावर बसवून अनेक पर्यटक धोकादायक भागात जात असल्यामुळे दरवर्षी अशा दुर्दैवी घटना घडत आहेत.

लोणावळ्यात किंवा इतरही पर्यटन स्थळांवर सावधानता बाळगा असा इशारा दिलेला असतो. मात्र, तरीही पर्यटक याकडे कानाडोळा करत असल्याचं वारंवार दिसून येते. गेल्या वर्षी 30 जून 2024 रोजी देखील अशीच घटना याठिकाणी घडली होती. पर्यटनासाठी पुण्यातून लोणावळ्याला आलेले संपूर्ण कुटुंब भुशी धरणाच्या बॅक वॉटरमध्ये वाहून गेले होते. पावसाचा आनंद घेत असताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढल्याने त्यात 10 जण अडकले. त्यातील 5 जणांना बाहेर काढण्यात यश आले तर पाच जण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले होते. धक्कादायक बाब म्हणजे बंदी असताना हे कुटुंब धबधब्याकडे गेले होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ जून २०२५


## नाना पटोले हे महाराष्ट्राचे पप्पू : आमदार परिणय फुकेंची बोचरी टीका



**भंडारा** : राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभेसंदर्भात जे वक्तव्य केले त्याचा खुलासा मुख्यमंत्र्यांनी केला आहे. पण महाराष्ट्राचे पप्पू नाना पटोले हे आहेत. त्यांनी आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा आत्मचिंतन करावे, असा उपरोधिक टोला भाजपचे विधान परिषदेचे आमदार परिणय फुके यांनी काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांना लगावला आहे. ते भंडारा येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

नाना पटोले यांनी केलेल्या वक्तव्यावर बोलताना डॉ. फुके म्हणाले की, लोकसभेच्या तुलनेत विधानसभेमध्ये मतदानाचा टक्केवारी वाढायला अनेक कारणे आहेत. लोकसभेमध्ये मतदानाची टक्केवारी कमी होती. लोकसभेत उन्हाळा होता त्यामुळे लोकांनी कुठेतरी कमी मतदान झाल्यामुळे कसे नुकसान होते, तसेच चुकीचे लोक निवडून येतात, हे सामान्य नागरिकांनी सामान्य जनतेने बघितले आहे. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळेस लोकांनी सतर्क राहून चांगल्या प्रकारे मतदान केले आणि म्हणून मतदानाची टक्केवारी सहा वाजल्यानंतर वाढली आहे. काँग्रेसच्या आरोपात काहीही तथ्य नसल्याचे म्हणत आमदार फुके यांनी नाना पटोले यांना चांगलेच धारेवर धरले आहे.

काँग्रेसने मतांच्या चोरीचा प्रश्न उपस्थित केला असता भाजप नेतेच त्याला उत्तर देत आहेत. नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: निवडणूक आयोगाची बाजू मांडली. आताही देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे हे निवडणूक आयोगाची बाजू मांडत आहेत. भाजपचे नेते निवडणूक आयोगाचे वकील आहेत का? असा सवाल नाना पटोले यांनी केला होता.

शिर्डी मतदारसंघात ७ हजार मतदार कसे वाढवले याचे पुरावे आहेत. ज्या मतदारसंघात मतदारांची जेवढी मतदार संख्या बोगस पद्धतीने वाढविली तेवढेच मताधिक्य त्या मतदारसंघात भाजपला मिळाले आहे. आम्ही पुराव्यानिशी मतदारयाद्यातील घोटाळा व बोगस मतदान दाखवतो, हिम्मत असेल तर भाजप नेत्यांनी ते खोडून दाखवावे, असे आव्हान काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी दिले होते.

## राजस्थानमध्ये गुर्जर समाजाच्या लोकांनी ट्रेन रोखली

**भरतपूर** : राजस्थानमध्ये गुर्जर महापंचायत संपल्यानंतर, भरतपूरमधील पिलुपुरा येथे समुदायाच्या लोकांनी ट्रेन रोखली. जमावाने रुळांवर येऊन कोटा-मथुरा पॅसेंजर थांबवली. त्यांनी दिल्ली-मुंबई रेल्वे ट्रॅक रोखला.

एवढेच नाही तर आंदोलकांनी ट्रॅक उखडण्याचाही प्रयत्न केला. महापंचायत स्थळापासून हा ट्रॅक फक्त १५० मीटर अंतरावर आहे. मागील आंदोलनांमध्येही हा ट्रॅक अनेकवेळा ब्लॉक करण्यात आला आहे.

यापूर्वी, आरक्षणासह अनेक मागण्यांबाबत भरतपूरच्या बयाना परिसरातील कारवारी शहीद स्मारक (पिलुपुरा) येथे रविवारी झालेल्या महापंचायतीला सरकारकडून मागण्यांचा मसुदा पाठवण्यात आला होता.

गुर्जर आरक्षण संघर्ष समितीचे अध्यक्ष विजय बैंसला यांनी ते लोकांना वाचून दाखवले. समाजाच्या संमतीनंतर महापंचायत संपुष्टात आली.

गुर्जर समाजाकडून सरकारला आज (रविवार) दुपारपर्यंतचा अल्टिमेटम देण्यात आला होता.

गृह राज्यमंत्री जवाहर सिंह बेधम म्हणाले होते- काही लोक आग्रही आहेत की आम्ही राहू आणि सरकारविरुद्ध बोलू. लोकशाहीत प्रत्येकाला आपले विचार व्यक्त करण्याचा अधिकार आहे. जेव्हा सरकार कोणत्याही महापंचायत आणि आंदोलनाशिवाय टेबलावर बोलण्यास तयार असते, तेव्हा महापंचायत कशासाठी?


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## निवडणूक झाली की किरण कुलकर्णीची बदली का केली? - हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी



**मुंबई** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लिहिलेल्या लेखातून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवर टीका केली आहे. तसेच निवडणूक आयोगाला काही प्रश्न सुद्धा विचारले होते. त्यांच्या लेखाला प्रत्युत्तर म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील लेख लिहीत प्रत्युत्तर दिले आहे. या नंतर काँग्रेसचे नेते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील टीका करत गंभीर आरोप केले आहेत. तसेच निवडणुकीनंतर किरण कुलकर्णींची बदली का केली? या अधिकाऱ्याची नार्को टेस्ट करण्याची देखील मागणी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राहुल गांधी यांनी काल काही प्रश्न उपस्थित केले होते, भाजपवर त्यात थेट आरोप नव्हता. लोकशाही वाचण्याच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ प्रश्न उपस्थित केले. निवडणूक झाल्यापासून राहुल गांधी सदर मुद्दयाचा पाठपुरावा करत आहेत. निवडणूक आयोगाने यावर उत्तर देणे अपेक्षित आहेत. मात्र, याची उत्तरे देवेंद्र फडणवीस व अमित शाह देत आहेत, असा टोला सपकाळ यांनी लगावला आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी आज लेख लिहिला आहे. गोंधळलेल्या परिस्थितीत हा लेख लिहिला आहे. तुम्हीच आरोपी आहात आणि तुम्हीच लेख लिहित आहात. त्यामधे तुमच्यासोबत केंद्रीय यंत्रणा आणि तुमचा पक्ष देखील आहे. रामशास्त्री प्रभुणे यांच्या बाण्यात असल्याचा आविर्भाव आणला. मात्र, त्यांचा कारभार घाशीराम कोतवाल सारखा आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले की, किरण कुलकर्णी नावाचे अधिकारी निवडणूक आयोगात काम करत होते. एस. चोकलिंगम यांच्यानंतर ते काम करत होते. वाढलेल्या मतदानाबाबत त्यांना सगळी माहिती आहे, निवडणुका संपल्या की मराठी भाषा विभागात त्यांची बदली केली. जेणेकरून कोणतीच बाब उघडकीस येऊ नये, असा गंभीर आरोप देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच, तत्काळ किरण कुलकर्णी या अधिकाऱ्याची नार्को टेस्ट करा, अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे.

आम्ही २०० मतदारसंघाचा डेटा समोर ठेवला आहे. केवळ ते दोन तीन मतदारसंघाचं उदाहरण देता. मग आमची मागणी आहे, त्यावेळीचे सीसीटीव्ही समोर आणा. त्याठिकाणी असणारे मदरबोर्ड तपासा आणि किरण कुलकर्णी यांची तत्काळ नार्को टेस्ट करा, असेही सपकाळ म्हणाले.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, तुम्ही गडचिरोलीला कशाला जातात हे सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे. कारण तिथे खाण आहे, तिथे आर्थिक हित जपण्यासाठी तुम्ही जातात. देवेंद्र फडणवीस सतत खोट बोलणारा माणूस आहे. आधी म्हणाले वेगळा विदर्भ झाल्याशिवाय लग्न करणार नाही. मात्र, तसे झाले नाही. दुसरे खोटे राष्ट्रवादी सोबत जाणार नाही नाही नाही, अजित पवार चक्की पिसिंग पिसिंग पिसिंग, मात्र आता त्यांनी मिक्सिंग मिक्सिंग मिक्सिंग केले आहे. ते केवळ क्लीन चीट देण्यात पटाईत आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी नारायण राणे यांच्या विरोधात गंभीर आरोप केले होते. ते कशी लूट करतात हे मांडले होते. पुढे काय झाले त्यांना क्लीन चिट दिली आणि त्यांना सोबत घेतले. त्यानंतर अजित पवारांवर आरोप केले, मात्र त्यांच्यासोबतच ते आहेत. नंतर छगन भुजबळ यांचे देखील उदाहरण आहे. आता लेख लिहून निवडणूक आयोगाला देखील क्लीन चीट दिली आहे. देवेंद्र फडणवीस ज्यांची बाजू घेतात त्यावेळी लक्षात घ्यावे दाल मे कुछ काला है, असे सपकाळ यांनी म्हटले.